**OIL & NATURAL GAS COMMISSION**
**(B.O.P.) KARMACHARI SANGHATANA**

Reg. No. (By - II - 8268) Tel.: 2659 9775 / 2656 2448
Acme Harmony, 1/102, Poonam Nagar, Opp. ONGC Colony, Jogeshwari (E), Mumbai - 102.

REF. : ONGC/KS/ /20 DATE :______________

# अभिनंदन !

फार काळ चाललेल्या संपामुळे, व्यवस्थापनावर त्याचे काय दुरगामी परिणाम होऊ शकतात याची जाणीव कर्मचारी संघटनेने 23 सप्टेंबर,2008 पासुन चालविलेल्या साखळी उपोषणामुळे व्यवस्थापनाला आणून दिली. हे उपोषण उरण, न्हावा, पनवेल, 11 हाई, वसुधारा भवन, हेलीबेस येथील इमारतींच्या दरवाज्यासमोर 12 दिवस चालले व यात ऑफशोअर व कचे-यातील, उरण प्लांटमधील, पनवेल, न्हावा येथील सर्व कर्मचारी सामिल झाले. ऑफशोअर मध्ये ड्रिलींग रिग्ज, प्रॉडक्शन प्लॅटफॉर्मवर सुध्दा दि.18.09.2008 व दिनांक 03.10.2008 रोजी 24 तासांचे लाक्षणिक उपोषण काम न थांबविता करण्यात आले.

सर्व कामगारांनी आपल्या अभेद्य एकजुटीची ताकद आज ओएनजीसी व्यवस्थापनाला दाखवून दिली आहे. यात कंत्राटी कामगार, डायरेक्ट एम्प्लॉईज, टेन्यूअर बेस एम्प्लॉईज, नव्याने भरती झालेले टेन्युअर बेस एम्प्लॉईज व कायम स्वरुपी कामगार हि सामिल झाले होते. यात ओएनजीसी मध्ये डायरेक्ट एम्प्लॉईज म्हणुन सर्व काम करणा-या रेडीओ ऑफीसरांनी एक महिना सुटी टाकली होती. त्याचा परिणाम म्हणुन हाजीराचे कंट्रोल रुम, उरण कन्ट्रोल रुम, हेलीबेस कंट्रोल रुम दि 01.10.2008 पासुन बंद करावे लागले होते. या गोष्टीचा योग्य तो परिणाम होऊन व्यवस्थापनाने आपल्या न्याय्य मागण्यासाठी कर्मचारी संघटनेला बोलणी करण्यास बोलाविले.

हे सर्व घडवून आणण्याचे श्रेय डायरेक्टर ऑफशोअर श्री एन.के.मित्रा, श्री सुशांत वत्स, ED-Chief (ER), श्री तौकीर हुसैन, GGM (HR/ER) या सर्वांना द्यावे लागेल. या सर्वांबरोबर झालेल्या चर्चेच्या फेरीतच आपल्या सर्व मागण्यां बद्दल सविस्तर व उपयुक्त चर्चा होऊन ओएनजीसी (बीओपी) कर्मचारी संघटना व ओएनजीसी व्यवस्थापन यांच्या संयुक्त चर्चेमध्ये सर्व समस्यांवर योग्य उपाय काढुन मागण्या मान्य करण्यात आल्या व आपल्या निदर्शनाचा, उपोषणाचा कार्यक्रम मागे घेण्यात आला.

**आपल्या मागण्यांचे सविस्तर विवेचन -**

**1) युनियनच्या मान्यतेसाठी निवडणूक**

व्यवस्थापनाने या संदर्भातील आपला हेतु स्पष्ट केला व ओएनजीसीने निवडणुकीसाठी आपले पत्र डेप्युटी चिफ लेबर कमिशनर (सेन्ट्रल) मुंबई यांना दिल्याचे सांगितले. डेप्युटी चिफ लेबर कमिशनर, मुंबई यांच्याकडून हे पत्र चिफ लेबर कमिशनर (दिल्ली) यांना पाठविण्यात आलेले आहे.

ओएनजीसी व्यवस्थापनाने, युनियनची मान्यता हि गुप्त मतदान पध्दतीनेच देण्यात यावी असे धोरण ठरविले आहे. त्यानुसार गेल्या दहा वर्षात ओएनजीसीच्या भारतातील सर्व प्रकल्पात सुमारे चार वेळा गुप्त मतदान झालेले आहे. या वर्षात आगरतला (त्रिपुरा) व आसाम येथेही युनियनच्या मान्यतेसाठी गुप्त मतदान घेण्यात आले आहे. हया गुप्त मतदानाचा निर्णय घेण्यासाठी आज मुंबई प्रकल्पातील पीईयू सुध्दा सहभागी होती. हा निर्णय घेतानां दोन वर्ष मान्यतेचा काळ कमी असुन, तीन वर्षे मान्यतेचा काळ करण्यात यावा असे ठरले त्यानुसार ठराव चिफ लेबर कमिशनर, दिल्ली यांना देण्यात आला होता. चिफ लेबर कमिशनरने ओएनजीसी अंतर्गत हा निर्णय घेऊ शकते असे कळविले त्यानुसार मान्यतेचा काळ तीन वर्ष करण्यात आला.

आज पीईयू ने चार वर्षे पूर्ण करुन पाचव्या वर्षात पदार्पण केले आहे. परंतु पीईयू ने निवडणुकीसाठी आपला होकार आज ही दिलेला नाही. व्यवस्थापनाने ठरविलेल्या धोरणावर व्यवस्थापन आजही ठाम आहे व या गुप्त मतदान पध्दतीच्या धोरणाचे भान पीईयूने ठेवलेच पाहीजे. हि भुमिका व्यवस्थापनाची आहे. गुप्तमतदानासाठी पीईयू चा होकार मिळविण्यासाठी त्यांना पुन्हा एकदा पत्र लिहीले जाईल याची हमी व्यवस्थापनाने घेतली आहे. अन्यथा चिफ लेबर कमिशनर व श्रम मंत्रालय याच्या साहाय्याने एकतर्फी निर्णय घेऊन गुप्त मतदान घेतले जाईल, याची जाणीव पीईयूला करुन देण्यात येईल व त्याची जबाबदारी व्यवस्थापनाने घेतली आहे.

**2. तृतिय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यासाठी मोबाईल व लॅप टॉप**

कराईकल, चेन्नई, राजामुन्द्री येथे चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना सुध्दरा मोबाईल देण्यात आल्याचे व्यवस्थापनाच्यचा नजरेस आणुन देण्यात आले. आज मोबाईल देण्यासंदर्भात GGM चे अधिकार काढून घेण्यात आलेले आहेत. आज कलकत्ता येथील प्रकल्पात सुध्दा चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना मोबाईल देण्यात आलेले आहेत. व्यवस्थापनाने सांगितले कि ईसी. मिटींगमध्ये तीन वेळा चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना मोबाईल देण्यासंदर्भात ठराव पाठविण्यात आला परंतु त्याला मंजुरी मिळाली नाही. कर्मचारी संघटनेने पुन्हा GGM व GM ला मोबाईल देण्यासंदर्भात अधिकार देण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. त्यामुळे मुंबई प्रकल्पातील चतुर्थ श्रेणी कर्मचा--यांना मोबाईल देता येतील. सुपरवायझरला (S-I, S-II, S-III) लॅप टॉप देण्यासाठी प्रस्ताव ईसी. मिटींग मध्ये पाठविण्याचे व्यवस्थापनाने मान्य केले आहे व सुपवायझर कॅडरला लॅप टॉप मिळवून देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केलेले आहे. बाकी चतुर्थ श्रेणी व तृतीय श्रेणी कर्मचा-यांना दुसरा कॉम्प्युटर अॅडवान्स देण्यासाठी ईसी. मिटींगला प्रस्ताव पाठविण्याचे मान्य करण्यात आले आहे. कारण कॉम्प्युटर अॅडवान्स पूर्वी प्रथम श्रेणी अधिका-यांपासुन चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांपर्यत सर्वाना देण्यात आला होता. तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना देण्यामुळे कॉम्प्युटर अॅडवान्स मध्ये वरिल कर्मचारी चांगल्या प्रतिचा लॅप टॉप घेऊ शकतात असे मंजुर करण्यात आले.

**3. डायरेक्ट व टेन्युअर बेस कर्मचा-यांना कायम करण्याबाबत**

ओएनजीसी व्यवस्थापनाने आसाम येथे कायम स्वरुपाच्या 72 जागा काढुन आसाम मधील टेन्युअर बेस कर्मचा-यांना कायम सेवेत सामावून घेतलेले आहे. मुंबई प्रकल्पात 2000 सालापासुन 79 टेन्युअर बेस कर्मचारी काम करीत आहेत. आज व्यवस्थापनाने फक्त 35 जागा कायम स्वरुपाच्या निर्माण केल्यामुळे बाकी 44 टेन्युअर बेस कर्मचारी कायम होण्यापासुन वंचीत रहाणार आहेत. हा मुंबई प्रकल्पावर अन्याय होत असल्याचे व्यवथापनाच्या नजरेस आणुन देण्यात आले. सर्व टेन्युअर बेस कर्मचा-यांना सामावून घेण्यासाठी आणखी जागा वाढवून देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केलेले आहे. डायरेक्टर ऑफशोअर श्री एन के मित्रा यांच्या कचेरीतून या वाढीव जागांसाठी पाठपुरावा करण्यात येईल व कर्मचारी संघटना सदर पाठपुरावा करुन या जागा डिसेंबर, 2008 पूर्वी आणून सर्व 79 टेन्युअर बेस कर्मचा-यांना कायम स्वरुपी नोक-या देण्यात येतील.

सुमारे 12 दिवस चाललेल्या या ऐतिहासीक संपामुळे देहरादून येथील व्यवस्थापनाने डायरेक्ट एम्प्लॉईजना कायम स्वरुपी नोकरी देण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू केले आहे. सर्व डायरेक्ट एम्प्लॉईजची शैक्षणीक माहीती गोळा झालेली आहे व यांना सुध्दा डिसेंबर, 2008 पूर्वी कायम करण्याचे व्यवस्थापनाने मान्य केलेले आहे. यासाठी रेडीओ ऑफीसरांनी एक महीन्याची सुट्टी टाकली होती त्याचा योग्य तो परिणाम होऊन व्यवस्थापनाने या डायरेक्ट एम्प्लॉईजना त्यांच्या शिक्षणाप्रमाणे नोकरीत सामावून घेण्याचे मान्य केलेले आहे.

## 4. ओएनजीच्या मालकीच्या रिगचे खाजगीकरण

ओएनजीसीच्या मालकीच्या ड्रीलींग रिग्ज वर बाहेरुन कर्मचारी व अधिकारी आणून चालविण्याचे ठरले होते. त्यानुसार सागर शक्ती, सागर ज्योती, सागर किरण या ओएनजीसीच्या मालकीच्या रिग्ज कंत्राटी पध्दतीवर चालविण्याचे ठरले होते. सागर किरण रिग ड्राय डॉकमध्ये होती. सागर किरण रिग चे नुतनीकरण करण्यासाठी ओएनजीसीने सुमारे 610 कोटी रुपये खर्च केलेले आहेत व दोन वर्षापेक्षा जास्त काळ रिग कोचीन येथील ड्रायडॉक मध्ये होती. ओएनजीसी कॉन्ट्रॅक्टच्या रिगना एक दिवसाचे 75 लाख रुपये भाडे देते. सागर किरण रिग दोन वर्षापेक्षा जास्त काळ ड्राय डॉक मध्ये होती विचार करा, किती कोटी रुपयाचे नुकसान झाले व ड्रीलिंग होऊ शकले नाही ते वेगळेच. याला जबाबदार कोण? व रिगचे नुतनीकरण झाल्यावर पुन्हा कॉन्ट्रक्टवर चालवायला देणे म्हणजे व्यवस्थापनाने कहरच केला होता या तीन रिग पाठोपाठ सागर भुषण व सागर विजय या फ्लोटर रिग कॉन्ट्रॅक्टवर देण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला होता. याशिवाय गेल्या वीस वर्षात सागर रत्ना रिगचे ड्राय डॉक झालेले नाही. सागर रत्ना रिगची स्थिती आज अत्यंत दयनीय आहे. त्याचप्रमाणे सागर उदय रिग चे ही ड्राय डॉकींग व्हावयाचे आहे. या दोन्ही रिग सुमारे दोन वर्षे ड्राय डॉक मध्ये रहातील.

सागर सम्राट रिगचे सुध्दा सुमारे 85 कोटी रुपये खर्चुन नुतनीकरण करण्यात आले होते. सागर सम्राट आज MNW प्लॅटफॉर्मला कायमस्वरुपी रहाण्यासाठी वापरण्यात येत आहे. म्हणजेच सागर सम्राट रिग ड्रिलींग करीत नाही. याचा अर्थ आपल्या रिगने ड्रिलींग थाबविल्यानंतर आमचे ड्रिलिंग टारगेट कसे पूर्ण होणार आज आपल्या कर्मचा-यांना मिळणारा प्रोत्साहन भत्ता, प्रॉफीट शेअरींग, वेल बोनस हे सर्व बंद होणार व कॉन्ट्रक्टर रिग चालवित असल्यामुळे, ओएनजीसी कर्मचा-यांचे अस्तित्वच संपणार आपण सर्वाना आठवत असेल हिरा पन्ना हा प्रोसेस प्लॅटफार्म तेल उत्पादनासह एनरॉन या परदेशी कंपनीला विकण्यात आला होता. हिरा पन्ना तेल क्षेत्र शोधुन काढण्याचे काम, ड्रिलींगचे काम, प्लॅटफॉर्म बांधुन तेल उत्पादन घेईपर्यंत ओएनजीसीच्या कर्मचा-यांनी काम केले होते व संपूर्ण बनलेला व भरपूर तेल उत्पादन देणारा हिरा पन्ना प्लॅटफॉर्म एनरॉन या परदेशी कंपनीला विकण्यात आला एनरॉनने कोट्यावधी रुपये कमवुन, हा प्लॅटफॉर्म, ब्रिटीश गॅस या परदेशी कंपनीस विकला. आज ब्रिटीश गॅस कंपनी करोडो रुपयांचा नफा कमवित आहे. म्हणजे ज्या हिरा पन्ना प्लॅटफॉर्मसाठी ओएनजीसी कर्मचा-यानी आपले रक्त व घाम दिला, त्याच प्लॅटफॉर्मवर परदेशी कंपनी प्रचंड नफा कमवित आहेत. आज ड्रिलींगमधील हे खाजगिकरण थांबविण्यासाठी कर्मचारी संघटना रस्त्यावर उतरली नसती तर हेच खाजगिकरणाचे लोण प्रॉडक्शन प्लॅटफॉर्मकडे वळले असते व आस्ते आस्ते सर्व तेल उत्पादनाचे प्लॅटफॉर्म हिरा पन्ना सारखे विकण्यात आले असते. आज हे खाजगिकरण कर्मचारी संघटनेच्या 12 दिवसांच्या ऑफशोअर व मुंबई मधील उपोषणामुळे थांबले आहे. हा कर्मचारी संघटनेचा सर्वात मोठा विजय आहे. आपल्या अस्तित्वाची लढाई आपण जिंकलो आहोत. हे सर्व आपल्या सक्रिय सहभागामुळेच शक्य झालेले आहे. कर्मचारी बांधवांनो, आणि भगिनीनों मॅनेजमेंटच्या दलालांनी हया सर्व आंदोलनात कुठेही सहभाग घेतलेला नाही. या दलालांना त्यांची जागा दाखवायची आहे. लवकरच गुप्त मतदानासाठी श्रम मंत्रालयातून ऑर्डर निघेल व यावेळी फक्त कर्मचारी संघटनाच निवडून येणार आहे व दलालांची दलाली संपुष्टात येणार आहे. आपल्या सर्वांच्या भक्कम पाठींब्यामुळे व एकजुटीमुळे हा विजय प्राप्त झालेला आहे.

आपल्या सर्वाचे पुन्हा हार्दिक आभार!

**कामगार एकता झिंदाबाद, कर्मचारी संघटना झिंदाबाद!**

(प्रदीप मयेकर)
सरचिटणीस